महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १७२ /२०२३ दि. १४/१०/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत अॅफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनी कडून मेट्रो ५ चे काम चालू आहे. सदर मेट्रोच्या पिलरवर गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी,** रेल्वेसाठी उभारण्यात आलेले पिलर क्र. ७, ८,९ वर ब्रॉडवे पेट्रोल पंप समोर गर्डर टाकण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) घोडबंदर ठाणे वाहिनी ब्रॉडवे पेट्रोल पंप समोरील स्लीप रोडवरून कापूरबावडी सर्कल मार्गे ठाणे चे दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **आर मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची वाहने आर मॉल येथून डावे वळण घेवून मनोरमानगर कडून सरळ – ढोकाळी सिग्नल येथून उजवे वळण घेवून – नंदीबाबा चौक, नळपाडा, कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** ब) सदर वाहने आर मॉल येथून डावे वळण घेवून – सर्व्हीस रोड मार्गे पुढे सरळ हॉटेल विहंग इन येथून डावे वळण घेवून पुढे सरळ जावून – जोधपूर स्वीटस् पासून उजवे वळण घेवून नळपाडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

१) दि. १४/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि. १५/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
२) दि. १५/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि. १६/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
३) दि. १६/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि. १७/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
४) दि. १७/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि. १८/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो

सदरची वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उप विभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.